# नक्षलवादाचे भविष्य

## मुलाखतकार- शरयू बापट

प्रवीण दीक्षित

निवृत्त पोलीस महासंचालक

(www.praveendixit.com)

16 March 2026

प्रश्नः सुरवातीच्या प्रवासाबद्दल काय सांगाल?

उत्तरः शालांत परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर, मी राज्यशास्त्र विषयात पुण्यातील फर्ग्युसन महाविद्तालयातून पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर, दिल्लीतील जे एन् यु येथील School of International Studies मधे International Politics ह्या विषयात पदव्युत्तर अभ्यास करीत असताना संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवेतील भारतीय पोलीस सेवेसाठीची स्पर्धापरीक्षा दिली व पहिल्याच प्रयत्नात 1977 मधे माझी निवड झाली.

प्रश्नः पोलीस व्हावे असे कधी वाटले?

उत्तरः मी भारतीय पोलीस सेवेची परीक्षा दिली होती, परंतु निवड होई पर्यंत पोलीसच व्हावे असे काही ठरवले नव्हते. स्पर्धापरीक्षेत यशस्वी होण्यासाठी तयारी करायची एवढेच माझे स्वप्न होते.

प्रश्नः तुमच्या कारकीर्दीतील तुम्हाला भावलेले प्रसंगः

उत्तरः राज्य राखीव पोलीस गटात समादेशक म्हणून काम करीत असताना, जवानांनी विनंती केली की रविवारी दुपारी आठवडा बाजार असतो तरी त्यावेळी त्यांना गटातून बाहेर जाण्यासाठी परवानगी मिळावी. आपत्ती काळात तातडीने

त्यांना जावे लागते असे सांगत, माझ्या सहाय्यकांनी त्याला विरोध केला, पण मी ती जोखीम स्वीकारून, काही तासांसाठी त्यांना बाहेर जाण्याची परवानगी दिली. मला वाटते, जर जवानांचे नीतीधैर्य चांगले असेल, जर त्यांचे मनःस्वास्थ्य चांगले असेल तर ते आपले काम उत्तम करतात.

दुसरा एक प्रसंग आठवतो. रायगड जिल्हयाचा पोलीस अधीक्षक म्हणून काम पाहत असताना मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी बोलावून सांगितले, न्हावा शेवा येथे बंदर बनवण्याची तातडी अहे परंतू तेथील शेतकरी कामगार पक्षाचे नेते जमीन मिळू देत नाहीत. तेव्हा जिल्हाधिकारी आणि मी मिळुन आम्ही बरेच प्रयत्न केले व शेवटी लक्षात आले की डाव्या चळवळीतील लोकांचा उद्देश वेगळाच आहे. तेव्हा आवश्यक बळाचा वापर करून जमीन ग्रहण करण्यात आली व त्यानंतर ज. नेहरू बंदर तयार झाले. विकास होऊ नये ह्यासाठी समाजवादी व डाव्या चळवळीतील नेते लोकांना भडकावत राहतात तेव्हा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक व कमीतकमी योग्य बळाचा वापर करावाच लागतो. त्यात हयगय करून चालत नाही.

प्रश्नः सगळ्यात कठीण प्रसंग

उत्तरः भारत सरकारतर्फे नेपाळमधील Chief Immigration Officer ह्यांच्याशी बोलणी करायला आम्ही काठमांडू येथे गेलो होतो. तेथील त्रिभुवन विमान तळावर इतकी बजबजपुरी होती की कोणत्याही तपासणीशिवाय परदेशी प्रवासी सहजपणे विमानात चढत होते. त्याचा पाकिस्तानी दहशतवादी गैरफायदा घेऊन भारतात येत होते. त्यवेळच्या नेपाळी सरकारच्या मदतीशिवाय परिस्थिती सुधारणे कठीण आहे ह्याची मला जाणीव झाली. नंतर 1998 साली एका अफगाण दहशतवाद्याने त्याप्रमाणे  नेपाळहून येणारे भारतीय विमान अपहरण केले, ते आठवत असेल.

प्रश्नः पोलीस म्हटले की काही stereotypes डोळ्यासमोर येतात. पोलीस खरच तसे असतात का? नाही तर पोलीस कसे असतात....

उत्तरः पोलीस म्हणजे दंडुका घेउन समोरील व्यक्तीला मारणारे, उद्धट, अरेरावी करणारे, प्रसंग झाल्यानंतर जागेवर पोचणारे अशा प्रकारचे चित्र हिंदी सिनेमांतून रंगवले जाते. त्या पाठीमागे सिनेमांना निधी पुरवणाऱ्या व दुबईतून भारतात स्मग्लिंग करणाऱ्या दाऊद गँगचा हात होता. जाणीव पूर्वक असे चित्र रंगवले गेले होते. प्रत्यक्षात, ज्यांचा पोलीसाशी संबंध येतो, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे पोलीस हे चौकस, गुन्हेगार ओळखुन त्यांच्यावर कारवाई करणारे लोकांना अनेक प्रकारच्या नैसर्गिक व मानवी आपत्तींमधे मदत करणारे असेच असतात. करोनाच्या वेळी पोलिसांची सगळ्याना किती मदत झाली, ते सगळ्यांना माहीत आहे. पोलिसांमधे अजूनही सुधारणा करण्यास खूप वाव आहे, पण शेवटी जसे लोक तसे पोलीस असे म्हणतात तेही खरे आहे.

प्रश्नः नक्षलवाद व महाराष्ट्र

उत्तरः नक्षलवादाचे लोण पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश ह्या राज्यात 1980 च्या सुमारास वाढू लागले. त्यावेळेस ह्या प्रांतांना सीमावर्ती असणाऱ्या महाराष्ट्रातील चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड ह्या भागातील काही तालुक्यात नक्षलवाद्यांनी हातपाय पसरायला सुरवात केली.

प्रश्नः नक्षलवादाची मूळ कारणे काय असावीत असे वाटते.... पोलिस म्हणून. मुख्य प्रसंग व आठवणी, आव्हाने

उत्तरः भारतातील इंग्रजांची सत्ता कायम रहावी म्हणून फोडा व सत्ता करा हे इंग्रजांचे तत्व होते. त्याप्रमाणे अन्य लोकांपासून त्यांना वेगळे करण्यासाठी, आदिवासी हे भारतातील मूळ निवासी आहेत, त्यांच्यात कोणत्याही प्रकारे बाहेरील विकास न करता त्यांना जसे आहेत तसे राहून देणे गरजेचे आहे असे धोरण बनवले गेले. भारतातील अन्य लोकांनाही तिथे जाण्यापासून बंदी होती. जसे बस्तर भागामध्ये. पण त्याच वेळी, ख्रिश्चन मिशनरींना मात्र तिथे धर्म प्रचार करायला, आदिवासी लोकांच्या समजुतींचा गैरफयादा घेऊन त्यांचे धर्मांतरण करायला पूर्ण मोकळीक

होती. हे तिथे राहून विकास होत नाही म्हणुन लोकांना चिथावत रहायचे व चीनच्या प्रेरणेने स्वतःला माओवादी म्हणवणारे, भारतीय घटना कशी बरोबर नाही व शस्त्राच्या जोरावर सत्ता काबीज करायला पाहिजे असा प्रचार करून त्यांना विरोध करणाऱ्यांना ठार मारत होते, लहान मुले मुली ह्याना पळवुन नेऊन चळवळीत ढकलत होते, विकास करायला येणाऱ्या कंत्राटदाारांना धमकावून खंडणी वसूल करत होते, पोलीस मधे कोणी भरती झाल्यास त्याच्या घरच्यांवर अनन्वित अत्याचार करीत होते. ह्या दुष्टचक्रामुळे प्रशासनतील कोणीही व्यक्ती ह्या भागात काम करायला जात नसे व गेल्यास त्यांना पगारातून ठरावीक रक्कम दर महिन्याला नक्षलवाद्यांना द्यावी लागत असे. पोलिसांनी कारवाई केल्यास सत्ताधाऱ्यांच्या जवळचे वकील न्यायालयात PIL करून, मानवाधिकाराच्या नावाखाली पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करत होते. पोलिस ठाणी लुटुन शस्त्रे पळवत होते, पोलिसांना ठार मारत होते. कुठेही रस्ते होऊन द्यायचे नाहीत, पूल नाहीत कारण त्यामुळे पोलीसांना जाणे येणे सोयीस्कर होईल, आरोग्य सेवा नाही शाळा नाहीत. स्थानिक लोकांना पूर्णपणे धाकात ठेवायचे, त्यांच्याकडून स्वतःच्या सगळ्या सोई करून घ्यायच्या, कोणी तयार नसल्यास, त्यांची निर्घृणपणे हत्या करायची. हे अत्याचार आत्तापर्यंत सर्रास संपूर्ण दंडकारण्य भागात पशुपति पासून तिरुपती पर्यंत चालू होते. दुर्गम अशा अबुजमाड पहाडी भागात नक्षलवाद्यांनी भारत प्रशासन मुक्त राज्याची निर्मिती केली होती. शस्त्रात्रांचे कारखाने LTTE च्या मदतीने चालवले होते असे आात्मसमर्पण केलेल्या प्रमुख नेत्याने नुकतेच सांगितले.

ह्या अशा परिस्थितीत देशातील 110 जिल्ह्यात नक्षलवाद फोफावत होता. न्यायालये, राजकीय पुढारी, मानवाधिकार कार्यकर्ते, माध्यमे सर्व बाजूंनी विपरीत परिस्थिती होती. रोज पोलिसांची, निरपराधी लोकांची हत्या होत होती, पोलीसांच्या कुटुंबियांचे अश्रू पुसणे सुद्धा अवघड होते. आमदार, कंत्राटदार ह्यांना पळवून डांबले जात होते. पोलिसांकडे आवश्यक शस्त्रे नाहीत, संरक्षक वाहने नाहीत, प्रशिक्षण नाही. त्यांचे मनोधेर्य पूर्णपणे खच्ची झालेले अशी स्थिती होती.

त्याचर मात करण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांनी विशेष दलांची स्थापना केली होती. स्थानिक लोकांची दले बनवण्याचा प्रयत्न होत होता, जसे छत्तिसगड मधील सलवा जुडुम. गोंडी भाषेत ह्याचा अर्थ शांती अभियान. स्थानिक आदिवासींना शस्त्रे देऊन राज्य समर्थित जन आंदोलन.  पण सर्वोच्च न्यायालयातील डाव्या विचारसरणीच्या सुदर्शन रेड्डीं सारख्या न्यायाधीशांकडून हे प्रयत्न हाणुन पाडले गेले.  विकास कामासाठी ठेवलेला निधी भ्रष्टाचारात संपत होता. महेश राउत सारख्या चळवळीतील अभ्यासकांना शिष्यवृत्ती देऊन ह्या भागात प्रोत्साहन दिले जात होते.

2004 मधे सर्व डाव्या जहाल गटांनी एकत्र येऊन कम्युनिस्ट पार्टी माओअिस्ट लेनिनिस्ट पक्षाची स्थापना केली. 2007 मधे त्यांनी Strategy and Tactics नावाची गुप्त पुस्तिका बनवली व अर्बन नक्षलवाद्यांच्या मदतीने भारताचे राज्य कसे हडप करायचे ह्याचा व्यूह तयार केला.

प्रश्नः नक्षलवादाबद्दल काँग्रेस व भाजपा सरकार ह्यांचा दृष्टिकोन कसा आहे?

उत्तरः कॉग्रेस केंद्रात सत्तेत असताना वरवर ते नक्षलवादाविरुदध बोलत राहत पण दुर्दैवाने त्यांचा चळवळीतील वेगवेगळ्या गटांना पाठिंबा असायचा. तसेच नक्षलवाद विरोधी निधी भ्रष्टाचारात विखुरला जायचा. पोलिसांना कोणत्याही प्रकारे स्षट आदेश नसल्याने कठोर कारवाई करायची अथवा कसे हे समजत नसे. त्यावेळचे मुख्यमंत्री, मंत्री जाहीरपणे सांगायचे एखादा पोलीस अधिकारी त्यांचे ऐकत नसेल तर थांब तुझी गडचिरोलीला बदली करतो.

ह्याा उलट 2014 नंतर तरुण निःपक्षपाती भारतीय सेवेतील उत्तम अधिकाऱ्यांना नक्षलग्रस्त भागात नेमले जाऊ लागले व त्यांच्या कामाचे कौतुक होऊ लागले, त्यांचा सन्मान करण्यात येऊ लागला.  2015 मधे पोलीस महासंचालक झाल्याबरोबर मी गडचिरोलीला गेलो होतो. तिथल्या जवानांनी मला अनेक अडचणी सांगितल्या. मी नागपूरला आलो तेव्हा मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस विमानतळावर मुंबईला जाण्याच्या तयारीत होते. तरीही त्यांनी माझ्यासाठी वेळ दिला. मी

सांगितलेल्या अडचणी ऐकून त्यासाठी त्वरीत निधी मंजूर केला व संबंधितांकडून पुढील आदेश काढले. तत्पूर्वी  सगळे प्रस्ताव वर्षानु वर्षे धूळ खात पडलेले असायचे.

2019 नंतर, अमित शहा गृहमंत्री झाल्यानंतर त्यांनी प्रखर राजकीय इच्छाशक्ती दाखवत सुस्पष्ट आदेश काढले व त्या प्रत्येक गोष्टीचा सतत पाठपुरावा केला. आवश्यक अर्ध सैनिक दले, सामग्री, वाहने, समन्वय, गुप्त वार्ता संकलीकरण अशा अनेक प्रकारे त्यांनी अद्‌भुत असे नेतृत्व करत जाहीर केले 31 मार्च 2026 पर्यंत नक्षलवाद संपवीनच. त्याप्रमाणे सर्व राज्ये व पोलीस दले कामाला लागली. नक्षलवादी अनेक नेते धारातीर्थी पडले व हजारो पाठीराख्यांनी आत्मसमर्पण केले. त्या सर्वांसाठी प्रशिक्षण, कौशल्ये, निधी, स्वयंरोजगार ह्यांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर मार्च 2026 नंतर सुशासन कसे राहील ह्यासंबंधी सर्व राज्यांना सतत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

प्रश्नः महाराष्ट्र सरकारला आलेले यश

उत्तरः गडचिरोली, गोंदिया येथील चळवळीतील नवीन भरती 2015 पासून पूर्ण बंद झाली होती. नवीन पुरवलेल्या प्रशिक्षणामुळे बॉबस्फोटात मृत्यु पावणे बंद झाले होते. आधुनिक शस्त्रे, वाहने, bullet proof jackets, communication network & sets   ह्यांचा पुरवठा, प्रभावी नेतृत्व ह्यामुळे एकाच वेळी 40 हून अधिक नक्षलवादी मारले गेले. दुर्गम भागात पोलीस ठाणी उघडण्यात आली. आदिवासी जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी पोलिसांनी एक खिडकी सारख्या योजना राबवून हजारो तरुणांना शासकीय मदत, रोजगार, स्वयंरोगार मिळवून देण्यात मोठी मदत केली.  त्याच बरोबर स्थानिक रोजगार, नवीन खाणकाम, आरोग्य सुविधा, शाळा, बँका, रस्ते, पूल बसेस असा अनेक सुविधा झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात जगातील सर्वात मोठे पोलाद बनवणारा भाग म्हणून ह्या जागेची ओळख होणार आहे. त्याशिवाय आदिवासींसाठी अन्य रोजगाराच्या संधी

उपलब्ध करून दिल्या जात आहेत व त्यांचे आरोग्यमान सुखकर करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे.

अर्बन नक्षलवाद; मुळात सर्व नक्षलवाद्यांनीच आमचा रस्ता चुकला, आम्ही शस्त्रे टाकली, आम्हाला शांततेने कुटुम्बासह रहायचे आहे हे वारंवार जाहीर केले आहे. त्यामुळे अर्बन नक्षलवाद कशासाठी हा प्रश्न शहरातील डाव्या चळवळीतील संबंधितांना पडणार आहे. विकासाच्या धोरणाला ते विरोध करत राहतील पण जनतेने त्यांना झिडकारलेले आहे ही काळ्या दगडावरची रेख आहे. त्यांचे पाठीराखे उघडे पडत राहतील व आम्ही कसे अयशस्वी झालो हे, ते लोकांना सांगत राहतील.

पंतप्रधान नरेन्द्र मोदींच्या स्वप्नातील 2047 च्या विकसित भारतात येणाऱ्या काळात दंडकारण्य प्रचंड प्रमाणात योगदान देईल हे नक्की.

---------------------------- ------------------------- -----------------------